# ससूनमध्ये निओनेटल आयसीयू

## नवजात अर्भकांना नवसंजीवनी : येत्या पंधरा दिवसांमध्ये सुविधा खुली

प्रज्ञा केळकर-सिंग • पुणे

बालकांच्या मृत्यूंमधील ५० टक्के मृत्यूंचे प्रमाण नवजात अर्भकांचे असते. कावीळ, श्वासोच्छ्वासाचा त्रास, कमी वजन, वेळेआधी जन्म अशा कारणांमुळे नवजात अर्भक दगावण्याची शक्यता निर्माण होते. अशा वेळी निओनेटल आयसीयूमधील अद्ययावत उपचारांनी बालकांचे प्राण वाचवता येऊ शकतात. ५९ खाटांचे अद्ययावत उपकरणे आणि अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज असलेले महाराष्ट्रातील पहिलेवहिले निओनेटल इन्टेन्सिव्ह केअर युनिट ससून सर्वोपचार रुग्णालयात आकाराला येत आहे.

ससून सर्वोपचार रुग्णालयातर्फे शासनदरबारी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सामाजिक भावनेतून मुकूल माधव फाउंडेशन आणि दगडूशेठ हलवाई ट्रस्टने सुमारे १० ते ११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

> नवजात अर्भकांचा मृत्यू ही चिंतेची बाब आहे. अर्भकांना दर्जेदार उपचारपद्धती मिळावी, यादृष्टीने मुकूल माधव फाउंडेशनतर्फे सीएसआरअंतर्गत मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये या कामाला वेग आला. ससूनमध्ये अनेक रुग्ण मोठ्या आशेने उपचारांसाठी असतात. त्यांना दर्जेदार उपचार मिळावेत आणि बालकांना नवसंजीवनी मिळावी, यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.
>
> \- रितू छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त, मुकूल माधव फाउंडेशन

ससूनमध्ये सध्या २२ खाटांचे निओनेटल आयसीयू कार्यरत आहे. त्यामुळे मर्यादित नवजात अर्भकांनाच अद्ययावत उपचारांचा लाभ घेता येतो. जास्तीत जास्त रुग्णांना ही सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी ससून सर्वोपचार रुग्णालयातर्फे शासनदरबारी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. ही सुविधा पूर्णत्त्वाला जावी आणि नवजात बालकांना अद्ययावत उपचार मिळावेत, यासाठी फिनोलेक्स, मुकूल माधव फाउंडेशन आणि दगडूशेठ हलवाई ट्रस्टने सीएसआरअंतर्गत सुमारे १० ते ११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. येत्या १५-२० दिवसांत हे आयसीयू रुग्णांसाठी खुले होईल, अशी माहिती ससूनमधील वरिष्ठ सूत्रांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.

नवजात बाळाची काळजी जन्मापासून ते २८ दिवसांपर्यंत घ्यायची असते. या काळात कमी वजन, वेळेआधी झालेला जन्म (प्रीमॅच्युअर बर्थ), श्वासोच्छ्वासाचा त्रास, कावीळ अशा अनेक कारणांनी बालकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. याच दिवसांत नवजात बालकांना जंतूसंसर्गाची जास्त शक्यता असते. अशा बालकांवर निओनेटल आयसीयूमध्ये उपचार केले जातात. ही उपचारपद्धती अत्यंत महागडी आणि सामान्य रुग्णांना न परवडणारी असते. पुण्यात खासगी रुग्णालयांतही ही सुविधा नाही. निओनेटल आयसीयूमध्ये अर्भकांच्या मातांना राहण्याची सोय नसते. मात्र, येथील आयसीयूमध्ये मातांसाठी विशेष जागेची व्यवस्था करण्यात आली आहे.